# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 14/03/2023 (मंगळवार) सायंकाळ

---

## पळवून नेणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल

**पो.स्टे. बोरी** – दिनांक १२/०३/२०२३ चे १०.३० वा. चे सुमारास पो.स्टे. बोरी हद्दीत फिर्यादीची अल्पवयीन मुलगी वय १७ वर्ष ०३ महिने व तिची मैत्रीण वय १५ वर्ष ४ महीने हया दोघेही मैत्रीनींना कोणीतरी अज्ञात इसमाने फुस लावुन पळवुन नेले होते. हया दोघीही मैत्रीणी परत आल्या असुन त्यांना त्यांचे आईवडीलांचे ताब्यात देण्यात आले आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. बोरी येथे आरोपीविरुध्द कलम ३६३ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास रेजीवाड मॅडम ९८३४८२५७९३ या करीत आहे.

## विनयभंग

**पो.स्टे. कन्हान** :– दिनांक १३.०३.२०२३ चे १९.०० वा. दरम्यान अल्पवयीन फिर्यादी/पीडिता वय १५ वर्ष हिच्या घरालगत असलेल्या झोपडयात फिर्यादी कोंबडया बेडत असताना नमुद आरोपी नामे– रजत रविंद्र वाहणे वय २५ वर्ष रा. शिवाजी चौक नरसाळा ता. मौदा हा तेथे येवुन फिर्यादीचे तोंड दाबुन फिर्यादीचा विनयभंग केला व कोणाला काही म्हणशील तर जिवाने मारून टाकीन अशी धमकी दिली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. कन्हान येथे आरोपीविरुध्द कलम 354(A), 354 (D), 506 भादवी सहकलम ८, १२ पोक्सो कायद्यान्वये अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. गुन्हयाचा पुढील तपास मसपोनी एल. जी. मलकुवार मॅडम पो.स्टे. खापरखेडा मो. नं. या करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**

**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**